# भारतीय राजकारणातील सांस्कृतिक राष्ट्रवादाचा अभ्यास

**डॉ. आकाश शेषराव बांगर**

**संशोधक विद्यार्थी**
**आदर्श महाविद्यालय, हिंगोली**

**प्रस्तावना**

भारतप्राचीन काळापासून विविधतेने नटलेला देश आहे. येथे अनेकधर्म, जात,पंथ, भाषा, प्रदेश, वेशभूषा, केशभूषा आणि परंपरा, विचारांचे लोक राहतात. असे असताना देखील भारत देश अखंड आहे. भारतीय राज्यघटनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीद्वारे या विविधतेस एक सूत्रात बांधण्याचा यशस्वी प्रयत्न केला गेलातो१९५० मध्येआणि प्रत्येक जात, धर्म आणि भाषा बोलणाऱ्या व्यक्तीला समान अधिकार दिले. निसर्गनिर्मित जीवन जगण्याचा अधिकर, स्वातंत्र्याचा अधिकार आणि विचार व्यक्त करण्याचा अधिकर इ. कुठल्याही बंधनाशिवाय देशातील प्रत्येक व्यक्तीला बहाल केला. राज्यघटनेतील कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत अधिकाराची तरतूद केली.

या ठिकाणी काळजी घेतली गेली ती बहुसंख्यांकाकडून अल्पसंख्यांकाचे शोषण होणार नाही याची. धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारण्यात आले. सर्व धर्मांना समानतेचे तत्त्व लागू करून धर्म ही खाजगी बाब मान्य करण्यात आली. म. गांधीनी धर्म आणि राजकारण वेगळया बाबी नसून परस्पर सुसंगत आहेत असे म्हटलं. या मागे त्यांचा हेतू असा होता कि भारतीय राजकारण नितीमत्तेवर आधारलेले असावे. पण वर्तमान राजकीय स्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, धर्म आणि राजकारण यांची फारकत केली जात नाही. तर स्थानिक स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरावरील होत असणाऱ्या सार्वजनिक निवडणूकात, स्थानिक स्वराज्य संस्था विधान सभा आणि लोकसभा इ. जात, धर्म, भाषा आणि प्रदेश या घटकांचा वापर केला जात आहे. धर्म आणि संस्कृतीच्या नावाखाली बहुसंख्यांकडून अल्पसंख्याकांचे आर्थिक आणि मानसिक शोषण, अन्याय, अत्याचार केले जात आहेत. प्रसंगी काल्पनिक मुद्दे समोर ठेवून राजकारण केले जात आहे. प्रसंगी अंतर्विरोधाचे राजकीय, सामाजिक वातावरण निर्माण करुन आपले राजकीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने बहुसंख्यांक जाती समूह करीत आहेत. ही सर्व घटनाप्रक्रिया 'सांस्कृतिक राष्ट्रवाद' या गोंडस नावाखाली केली जात आहे.

**शोधनिबंधाचेउद्देश:-**

१) सांस्कृतिक राष्ट्रवादाचीसंकल्पनाअभ्यासने.
२) भारतीय राजकारणातील सांस्कृतिक राष्ट्रवादाचा आढावाघेणे.
३) सांस्कृतिक राष्ट्रवादाच्यासमस्यांवरउपाययोजनासुचविणे.

**माहितीचे संकलन आणि विश्लेषण:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विविध संदर्भ ग्रंथ साप्ताहिके मासिके इंटरनेटवरील वेबसाईट, या दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला असून याठिकाणी आशय विश्लेषणाचे तंत्र वापरून मुद्देसूद पद्धतीने मांडणी करण्यात आलेली आहे.
'सांस्कृतिक राष्ट्रवादाचा'सविस्तर अभ्यासपुढीलप्रमाणे.

धर्माचा व जातीचा राजकारणात अधिक प्रमाणात वापर केला जात असल्याने अल्पसंख्यांकांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत नाही. म्हणून ते विकासापासून वंचित राहतात. या संदर्भात डॉ. आंबेडकर त्यांच्या 'State and Moinorities' या ग्रंथात म्हणतात, " राज्याने प्रत्येक व्यक्तीला स्व- विकास करण्याची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे."" थोडक्यात राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत इ आले पाहिजे. कुठल्याही मानवनिर्मित भौतिक अथवा अभौतिक संस्थाच्या बंधनाशिवाय प्रत्येक व्यक्तीला विकास करता आला पाहिजे, असा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्त करतात.

आजच्या राजकारणात 'जातीचे बहुमत हेच राजकीय बहुमत' असे समीकरण निर्माण केले जात आहे. याचा दूरगामी परिणाम धार्मिकः आणि जातीने अल्पसंख्यांक घटकावर होत आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत इ आले पाहिजे. राजकारणात राजकीय बहुमताचे परिवर्तन बर्गरचनेमध्ये होत

असून ते सतत वाढत जात आहे. जातीय बहुमत निर्माण करण्यात येऊन सांप्रदायिक मताला जातीय बहुमतात रूपांतरीत करून जातीयवादी सरकारची स्थापना करणे म्हणजे जातीयवादाच्या हुकूमशाहीची स्थापना करणे होय. म्हणून वावर उपाय असा की, लहान-लहान राज्याची निर्मिती आणि विधानसभेत त्यांना (अल्पसंख्यांकाना) प्रतिनिधित्व मिळणे हे होय. " म्हणून राज्यसंस्था ही सर्व समाज घटकांची कल्याण करणारी असावी. त्याचबरोबर समाजाभिमुख आणि विकासाभिमूख असावी. यासंदर्भात प्रसिद्ध अमेरिकन विचारवंत थॉमस पेन म्हणतो, "जे चुकीने ठरवलेले असते ते कधीच कायमचे नसत. ते पुन्हा ठरवावे लागत." पेन राज्यव्यवस्थेच्या कार्यावर अचूक भाष्य करतो. त्याचे हे प्रतिपादन भारतीय लोकशाहीत (राजकारणास ) पुरक आहे, असे मला वाटते. थॉमस पेनच्या मताप्रमाणे ज्या देशात लोकशाही शासन प्रणाली अस्तित्वात आहे, तेथे समाजाभिमुख शासनव्यवस्था निर्माण करण्यासाठी सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवण्यासाठी सक्षम विरोधी पक्ष असावा लागतो. कारण पूर्ण बहुमतात असणारे शासन हुकूमशाही बनण्याचा धोका असतो. या प्रसंगी डॉ. आंबेडकर १९४८ मध्ये एप्रिल महिन्यात लखनौ येथील अधिवेशनात म्हणाले होते, काँग्रेसची स्थिती आज आग लागलेल्या घरासारखी झाली आहे."" डॉ. बाबासाहेबांचा हा राजकीय दूरदृष्टीकोण आजही भारतीय राजकारणास लागू पडतो. सक्षम विरोधी पक्षाच्या अभावामुळेच अनाकलनीय भावनिक मुद्दे समोर ठेऊन जनतेला वेठीस धरले जात आहे. उदा. CAA NRC, NPR

डॉ. आंबेडकरांना या गोष्टीची जाणीव होती म्हणून त्यांनी भारताच्या भवितव्यावर भाष्य केले होते की, (State on Linguistic) बंधुभावनेच्या आधारावर एखादे स्थिर आणि लोकशाही राष्ट्र अस्तित्वात असते. एक राज्य, एक भाषा हा नियम आवश्यक आहे. त्याची दोन कारणे आहेत. राज्यांमध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये मातृत्वभाव नसेल तर लोकशाही संघर्षाशिवाय टिकूच शकत नाही. त्याचबरोबर 'एक राज्य, एक 'भाषा' तत्त्व अंगीकारणे आवश्यक आहे. त्याचे कारण म्हणजे जातीय आणि सांस्कृतिक विरोध नष्ट करणे हा होय. भाषावार प्रांतरचना भारतात आवश्यक आहे. कारण लोकशाहीच्या स्थापनेसाठी आणि संवर्धनासाठी आणि दुसरे म्हणजे जातीय व सांस्कृतिक तणाव दूर करण्यासाठी.भारतातील बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक यांच्या परस्पर वर्तनांवर प्रकाश टाकताना डॉ. आंबेडकर म्हणतात, "खरे पणा हेच राजनीतीचे मूळ आहे. माझ्या व्यवहारिक बाजूंचा अर्थ असा की, ज्या समुदायांवर राजकीय योजना लागू करावयाची आहे, त्या समाजाची सामाजिक संरचना लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. राजकीय व्यवस्था सामाजिक व्यवस्थेवर आधारलेलो असते." या वास्तवतेचा विसर आजच्या राज्यकर्त्यांना पडलेला दिसतो. उलट भांडवलशाहीचे व ब्राह्मणशाहीचे पूर्ण आणि अपूर्ण असे हिंस्व रूप भारताला आजही निरूपद्रवी नागरिकांना गाळत सुटलेले आहे. सत्याचे मोहक मुखवटे घातलेली असत्य ही पराकोटीची विनाशकारीच असतात. शिवाय मुखवट्यांना पुजणारे लोक असले को, असत्य विजयी होतात.

असाच प्रत्यय आज भारतीय राजकारणात दिसतो आहे. संस्कृतीच्या नावाखाली (जात, धर्म, भाषा) बहुसंख्यांक वर्ग आजहीभारतातील अनेक राज्यात विशेषतः युपी, बिहार, मध्यप्रदेश, उत्तराखंड राज्यातील दलित, आदिवासी या मागास समुदायावर अन्याय, अत्याचारकेले जातात.पूर्वीपासून चालत आलेल्या धार्मिक प्रथा, परंपरा आणि सामाजिक बहिष्कारांमुळे तसेच अंधविश्वास, दैववाद, पुनर्जन्म, पाप-पुण्याच्या कपोल कल्पित कथा यामुळे दलित समाजाचे अबमूल्यन झालेले दिसते. यास ब्राह्मणवादी व्यवस्थेने संस्कृती असं गोंडस नाव दिले आहे." अशा प्रकारच्या भूलथापांना भारतीय समाजातील फार मोठा समूह बळी पडलेला आहे. त्यामुळे तो विकासापासून वंचित आहे. शिवाय वर्चस्ववादी समाजाकडून (जातीकडून) सामाजिक समस्येच्या नावाखाली विभिन्न सामाजिक समूह, एस.सी. एस.टी, ओबीसी व इतर मागासवर्ग, हिंदूत्ववादी संघटनाकडून एकत्र करून त्यांच्याकडून 'गर्व से कहो हम हिंदू है' अशा घोषणा वदवून घेतल्या जातात.' ही आजची स्थिती आहे. या भावनिक मुद्यांमुळे सामाजिक आणि राजकीय ध्रुवीकरण होऊन सत्ता ही बहुसंख्यांक वर्गाच्या हाती केंद्रीत होत आहे.

सन १९९० मध्ये जेव्हा ओबीसी वर्गाला नोकल्यात २७ टक्के आरक्षण देण्यात आले तेव्हा मंडल कमीशनच्या विरोधात हिंदू संघटनाकडून 'कमंडल' यात्रा काढण्यात आली. त्याचे पर्यावसन १९९२ मध्ये मस्जिद प्रकरण घडले. यातून सांप्रदायिक राजकारणाचे 221 झाले. सद्यस्थितीत राज्याच्या राजकारणात धर्माचा संकुचित दृष्टीकोन प्रस्फुटीत होताना दिसून येतो आणि यातूनच सांप्रदायिकतेचे राजकारण निर्माण होत आहे.

**सारांश आणि उपाययोजना**

भारतीय राजकारणाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, मागील ७० वर्षात लोकशाही जितक्या प्रमाणात प्रगल्भ व्हायला पाहिजे होती, ती झाली नाही. राजकीय लोकशाही काही प्रमाणात बहुसंख्यांक बरोबर अल्पसंख्यांकांना राजकीय सहभाग मिळाला परंतु त्या राजकीय लोकशाहीचे सामाजिक आणि राजकीय लोकशाहीत रूपांतर झाले नाही. उलट

राजकारणात धर्म, जात आणि भाषा या घटकांना प्राधान्य दिले जात आहे. व्यक्तीपूजेला जास्तीचे महत्त्व देवून राजकारणाचे ध्रुवीकरण केले जात आहे. डॉ. बाबासाहेब म्हणत, 'व्यक्ती पूजा (विभूतीपूजा) लोकशाहीला मारक ठरू शकते याचा विसर भारतीय समाजाला पडत चालला आहे. भावनिक मुद्यांवर राजकारण केले जात आहे, ही बाब भारतीय लोकशाहीला मारक ठरणारी आहे. म्हणून मला असे वाटते की, वर्तमानातील बदलते राजकीय संदर्भ लक्षात घेऊन सर्व समाज घटकांचाविकास करण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करून सर्वांना लोकशाहीत (राजकीय) सामावून घेतले पाहिजे. अधिक प्रमाणात लोकांना शिक्षणाच्यामाध्यमातून राष्ट्रनिष्ठा, देशप्रेम, राजकीय प्रक्रिया याचे ज्ञान, शिक्षण दिले पाहिजे.

**संदर्भसूची**


१) Dr. B. R. Ambedkar, State and Moinorities, Pub By PradipRodage
२) डॉ. आंबेडकर, भाषावार प्रांतचरना, पृ. १४
३) ३) संपादक बी. सी. कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अखेरचे संसदीय विचार, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९७३, पृ. ९०
४) डॉ. यशवंत मनोहर, सावधान निष्ठानो एकत्र या आणि शासनकर्ते व्हा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १३ डिसेंबर २०१८
५) उपरोक्त डॉ. आंबेडकर भाषावाद प्रांतरचनामधून पृ. १४
६) कित्ता, पृ. ४४
७) संपा राजकिशोर, आज के प्रश्न, दलित राजनीति कि समस्याएं, वाणी प्रकाशन, दरियागंज, न्यू दिल्ली, पृ. १४१
८) कित्ता, पृ. १४२
९) J. C Johari, Indian Political System, Amol Publication Ltd. New Delhi, p. २७५